## प्रकरण सहावे

# 'डी.बी. रत्नाकरांच्या कवितेचे वाङ्मयीन मूल्यमापन'

- प्रस्तावना

१) डी.बी. रत्नाकर यांच्या काव्यसंग्रहांची शिर्षके.
२) रत्नाकर यांच्या कविता संग्रहांची अर्पण पत्रिका.
३) डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील मुक्तछंद.
४) डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील वैचारिकता.
५) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील भावाभिव्यक्ती.
६) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील व्यक्तिचित्रणे.
७) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील संवादात्मकता.
८) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेची भाषा.
९) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी.
१०) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील मिथके.
११) डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील 'स्व' चा शोध.
१२) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेचा रूपबंध.
१३) डी.बी. रत्नाकरांच्या कवितेतील नवीन शब्दरचना.

- निष्कर्ष
- समारोप
- संदर्भ सूची

-----

## प्रकरण सहावे

# डी.बी. रत्नाकरांच्या कवितेचे वाङ्मयीन मूल्यमापन

कवी रत्नाकरांच्या तिन्ही कवितासंग्रहांचा वाङ्मयीन दृष्टीने विचार करत असताना त्यांची एकूणच कविता ही आशयाच्या अंगाने वेगळी आहे. तशी ती अभिव्यक्तीच्याही अंगाने वेगळी आहे. या आशयाभिव्यक्तितील वेगळेपण शोधण्याचा या प्रकरणात प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कवितासंग्रहांच्या अर्पणपत्रिका, आंबेडकरी समाजमनांच्या भावभावनांचा आविष्कार, मुक्त छंदात्मक रचना, वैचारिकता, विद्रोहाचा आवेशपूर्ण पण वैचारिक आविष्कार, नवी शब्दसृष्टि, प्रतिमा, प्रतीके, साधी सरळ शब्दकळा आणि संवादात्मकता या सर्व अभिव्यक्ती वैशिष्ट्यांनी युक्त असणाऱ्या रत्नाकरांच्या कवितेतील विविध पैलूंचा वाङ्मयीन दृष्टिने अभ्यास करता येईल.

## १) डी.बी. रत्नाकर यांच्या काव्यसंग्रहांची शिर्षके :

डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेचा वाङ्मयीन दृष्टीने विचार करत असताना प्रथम त्यांच्या कवितासंग्रहांच्या शीर्षकांचा विचार करावा लागेल. त्यांच्या तिनही संग्रहांची शीर्षकेही प्रत्येक संग्रहाचे वेगळेपण आणि एक वेगळी दिशा दर्शन करतात. प्रत्येक शीर्षकाने त्या त्या संग्रहाचे वेगळेपण मांडलेले आहे. सर्वच शीर्षके विचार प्रवृत्त करणारी अशीच आहेत. तसेच या संग्रहाच्या शीर्षकांबरोबरच त्यांच्या कवितांचीही शीर्षके विचार करण्यास भाग पाडतात.

त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे शीर्षक 'हॉटेल माझा देश' तर दुसऱ्या संग्रहाचे 'लक्तरांची गझल' असून तिसरे शीर्षक 'सैतानाच्या खांबावर' असे आहे. ही शीर्षके या काव्यसंग्रहांना येतात, ती या काव्यसंग्रहांचे सौंदर्य वाढविण्यासाठी नव्हे, तर या शीर्षकांपाठीमागे त्यांच्या स्वत:च्या दु:खाबरोबरच सामाजिक भयाणक, वास्तव दु:ख आहे. आंबेडकरी समाजाला इथल्या परंपरावादी धर्मांने जी वर्तणूक दिली. जी गुलामी लादली त्या गुलामीतून निर्माण झालेली कोंडी व या अनेक शतकांच्या कोंडीतून निर्माण झालेला विद्रोह या सर्वांच्या मिश्रणातून ही शीर्षके तयार झालेली आहेत. या शीर्षकांच्या मागे भयानक भूतकाळ आहे. तसाच पराक्रमाचा तेजस्वी इतिहासदेखील आहे. म्हणून या सर्वांतून रत्नाकरांची ही शीर्षके निर्माण झालेली आहेत. त्यांच्या पहिल्याच कवितासंग्रहाचे शीर्षक 'हॉटेल माझा देश' हे अर्थपूर्ण शीर्षक खूप काही सांगून जाते. या संदर्भात कवी स्वत: म्हणतो, ''संपूर्ण हॉटेल लाईनचे धगधगते जीवन

कोणीच कसे शब्दबद्ध केले नाही ?... त्या झपाटलेल्या अवस्थांचे अवशेष म्हणजेच 'हॉटेल माझा देश'.''[१] या मनोगतावरून हे लक्षात येते की, आजपर्यंत मराठी कवितेमध्ये हा विषय इतका ज्वलंत असून कसा आला नाही. म्हणूनच या देशाचे हे प्रयोजन आहे.

हॉटेल कामगारांचे वास्तव जीवन, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या यातना, त्यांचे समाजातील स्थान, याचे चित्रण या कवितेतून येते. हॉटेल सारखी समता आपल्या देशात निर्माण झाली तर नक्कीच आपला देश प्रगतीचे शिखर गाठेल. या आणि अशा अर्थपूर्णतेतून हे शीर्षक कवी रत्नाकरांनी योजलेले आहे. या संग्रहातील कवितांची शीर्षकेही बोलकी, वास्तवदर्शी व आशयगर्भ अशीच आहेत. उदा. कप, अॅश-ट्रे, फ्रायपॅन, टॉवेल, मलई कोप्ता इत्यादी. शीर्षकांच्या बाबतीत त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाचे शीर्षक 'लक्तरांची गझल' असे आहे. या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे हॉटेल माझा देश मधील कविता लिहिणाऱ्या रत्नाकरांनी 'गझलसारखा विषय हाताळलेला आहे. गझल हा काव्यप्रकार मुळात अजून मराठीमध्ये रूजावा तेवढा रूजलेला नाही. गझल ही मुळात प्रेमभावना, शृंगारभावना व्यक्त करण्यासाठी लिहिलेल्या कवितेचा प्रकार आहे. मात्र रत्नाकरांनी या गझलेला सामाजिक आशय दिलेला आहे.

आंबेडकरी चळवळीत काम करणारी माणसे ही मुळातच तळागाळातील शुद्रातिशुद्र, वेसी बाहेरची आहेत. त्यांना अनेक शतके वाचा नव्हती, अभिव्यक्ती नव्हती, स्वातंत्र्य नव्हते. या समाजातून प्रज्ञासूर्य बाबासाहेबाच्या तेजस्वी प्रकाशात जी माणसे पुढे आली ती चळवळ करू लागली. मात्र अठराविश्व दारिद्र्य पाठीवर होतेच. तरीही आंबेडकरी चळवळीतला कार्यकर्ता हा जसा आंबेडकरी विचार मानतो तसेच तो बुद्धाचे सुद्धा विचार मानतो. म्हणून सामाजिक बांधिलकी स्वीकारुन, आपल्या सारख्याच समस्त फाटक्या माणसांना तो आपल्याजवळ असणाऱ्यातील थोडे थोडे देतो. या शीर्षकातून इथल्या पारंपरिक व्यवस्थेने एका विशिष्ट समाजावर लादलेल्या अन्याय अत्याचारी भूतकाळाचा व वर्तमानाचाही खुलासा होतो. म्हणून हे शीर्षक वाङ्मयीन निकषांवर श्रेष्ठ दर्जाचे आहे.

कवी रत्नाकरांच्या तिसऱ्या कवितासंग्रहाचे शीर्षक 'सैतानाच्या खांबावर' असे आहे हेही इथल्या अनेक शतकांच्या अन्यायाचे सूचन करणारे आहे. डॉ. प्रकाश देशपांडे केजकर या शीर्षकासंबंधी म्हणतात, ''सैतानाचा खांब दुष्ट आणि खलनायकी

प्रवृत्तीचा जसा प्रतीक आहे तसा या नैतिक आराजकाचेही प्रतीक आहे."[२] या नैतिक आराजकाला शह देऊन एका नव्या अनुशासन पर्वाला सुरुवात केली पाहिजे. याची जाणीव हे शीर्षक करून देते. या संग्रहातील कवितेंची शीर्षके ही अर्थ गहन अशीच आहेत. उदा. 'जोतीबा फुल्यांनी म्हटले तसे', 'चोची बोलक्या करणारा बाप' इ. वर्तमान समाजात चाललेला ढोंगीपणा, धर्माच्या संस्कृतीच्या नावावर चाललेल्या आराजकतेवर भाष्य करत ही सैतानी आराजकता कोसळू लागल्याचे सूचन हे शीर्षक करते आणि म्हणूनच या शीर्षकाला वाङ्मयीन मूल्य प्राप्तझालेले आहे. कवी रत्नाकरांच्या सर्वच संग्रहातील कविता हक्ष शीर्षके घेऊनच येतात. या शीर्षकांना कोणतेही बंधन असलेले जाणवत नाही. त्यामुळे समर्पक आशय मांडणीला मदत झालेली आहे. या सर्व गोष्टींमुळेच या संग्रहांची शीर्षके अर्थपूर्ण व परिणामकारक असलेली दिसतात.

**२) रत्नाकर यांच्या कवितासंग्रहांची अर्पणपत्रिका :**

डी.बी. रत्नाकरांच्या कवितांचे मूल्यमापन करत असताना त्यांच्या कवितासंग्रहाच्या पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंतचा आशय हा सनातन सामाजिक संघर्षाचे सूचन करणारा आहे. रत्नाकरांनी ज्या अर्पणपत्रिका लिहिलेल्या आहेत, त्या पाठीमागे पराकोटीचा आदरभाव आहे. तशी हजारो वर्षांच्या यातनांची भयंकर वेदनाही आहे. या अर्पणपत्रिका कवी रत्नाकरांच्या वैचारिक जाणिवेंचे सुस्पष्ट दर्शन घडवितात. त्यांची निष्ठा, श्रद्धा व्यक्त करतात. या संग्रहाच्या अर्पणपत्रिका ह्या पुस्तक कोणालातरी अर्पण करायचे म्हणून निर्माण झालेल्या नाहीत. तर ज्यांनी ज्यांनी बहुजनांचा तेजस्वी इतिहास घडविला, परिवर्तन घडविले, समाजोन्नतीसाठी आणि एकूण सर्वहारा माणसांच्या कल्याणासाठी आपले आयुष्य व्यथित केले, त्या परिवर्तनाच्या प्रवर्तक मुक्तीदात्यांना अर्पण केलेल्या आहेत. तसेच ज्यांनी प्रत्येक दिवस अपमान सोसून सतत इतरांची सेवा केली त्या कामगारांनाही अर्पण आहेत.

कवी रत्नाकरांचा पिंडच आंबेडकरी चळवळीच्या सच्चा कार्यकर्त्याचा असल्याने माणसाच्या कल्याणार्थ जे मंगल आहे त्याचा स्वीकार व अन्यायाला प्रतिकार या तळमळीतून या अर्पणपत्रिका तयार झालेल्या आहेत. 'हॉटेल माझा देश' या संग्रहाची अर्पणपत्रिका ते हॉटेलात काम करणाऱ्या तमाम कामगारांच्या दुःखाला, वेदनेलाच नव्हे तर त्यांच्या अगतिकतेला अर्पण करतात. क्रांतीबा फुल्यांनी आपला 'गुलामगिरी' हा ग्रंथ अमेरिकेतील उपेक्षित निग्रोच्या उत्थापणासाठी प्रयत्न करणाऱ्यांना

अर्पण केलेला आहे. हाच म. फुल्यांचा क्रांतीकारी वारसा कवी रत्नाकरांनी प्रामाणिकपणे चालविलेला आहे.

त्यांच्या 'सैतानाच्या खांबावर' हा संग्रह त्यांनी क्रांती जोती सावित्रीबाई फुले व रमाबाई भीमराव आंबेडकर या दोन थोर मातांना अर्पण केलेला आहे. जिने आम्हाला शिक्षण दिले, आणि जिने सतत कष्ट सोसून प्रज्ञासूर्याला समाजकार्यासाठी सोडले या दोन बहुजन मातांचा त्याग व त्या त्यागामुळे घडलेला इतिहास हा तेजस्वी आहे. म्हणून ही अर्पणपत्रिका सूचक वाटते. त्यांच्या 'लक्तरांची गझल' या संग्रहाला अर्पणपत्रिका नाही. वरील दोन्ही संग्रहाच्या अर्पणपत्रिका ह्या विचारपूर्वक दिलेल्या आहेत.

रत्नाकरांच्या या संग्रहांच्या अर्पणपत्रिका सूचकतेबरोबरच आपल्या भावना प्रकट करताना दिसतात.

### ३) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील मुक्तछंद :

दलित कविता ही मुळातच सामाजिक धगधगते वास्तव घेऊन आविष्कृत झालेली आहे. म्हणूनच प्रामुख्याने ती मुक्तछंदातच येते. मुक्त व मोकळा सरळ आविष्कार अनुभूतीच्या माध्यमातून मांडला जातो. त्यामुळे यमकबद्धता इथे नाही. रत्नाकरांची 'हॉटेल माझा देश' व 'सैतानाच्या खांबावर'मधील कविता ही मुक्त छंदातच येते. मात्र 'लक्तरांची गझल' हा गझल संग्रह त्याला अपवाद आहे. या संग्रहातील गझला ह्या यमकात आहेत. मात्र ही भाषा अलंकार युक्ततेपासून अलिप्त आहे. कारण या कवितांमधून त्यांनी आपल्या अनुभवाची व सामाजिक भयाण दु:खाची मुक्तपणे अभिव्यक्ती केलेली आहे. उदा.

> ''चारी बाजूला फाटलेला फाटक मी चाललो
> फाटलेली लक्तरे वाटत मी चाललो
> नाही कधीच मिळाले ताजे मला तुकडे
> रस्त्यातल्या पत्रावळ्या चाटत मी चाललो.''[३]

रत्नाकरांची मुक्तछंदातली कविता ही उपजतच एक संगितात्मकता घेऊन येते. त्यामुळे ती रंजनात न गुंतता आपल्या जीवनातील दाहक अनुभव व असहाय्य दु:खाचा आविष्कार घडविते. प्रस्थापित मराठी कवितेसारखी ती चंद्र, चांदण्याची कलाकुसर करत बसत नाही. कारण इथे भयंकर वेदना आहे. अनेक वर्षांचा अत्याचार आहे. हा अन्याय अत्याचारच शब्दांचे जहाल रूप घेऊन मुक्तछंदात प्रकटलेला आहे.

"जातक कथेतला बुद्ध
संतापाचा ताप भरलेला मनुष्य
थुंकतो तोंडावर पच्कन
तरी नाही बोलत
क्षमाशील चिवराने तोंड पुसून
नगरा नगरात जातो बनवत
प्रेमशांतीचे रस्ते."[४]

कवी रत्नाकरांची गझल सोडली तर इतर दोन्हीसंग्रहातील कविता ही प्रामुख्याने मुक्त छंदातच आलेली आहे. त्यामुळे हवा तो आशय मांडून योग्य तो परिणाम साधलेला आहे.

## ४) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील वैचारिकता :

कवी रत्नाकरांच्या कवितेचे मूल्यमापन करत असताना त्यांच्या कवितेतील भावाशयाबरोबरच वैचारीकताही प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट आहे. मुळात या कवितेला जगण्याची आच आहे. जगत असताना सोसाव्या लागणाऱ्या यातनेची, दु:खाची, असहाय्यतेची बोच आहे. त्यामुळे ही कविता भावूक न होता तिचा पायाच वैचारिकतेतून घडत गेलेला आहे. कवी रत्नाकर आपल्या कवितेच्या संदर्भात म्हणतात, "माझे हे फाटके जीवन बाबासाहेबाच्या प्रेरणेने मी सांधत आलोय. म्हणूनच वाट्याला आलेले घृणास्पद अनुभव, जीवनाबरोबर केलेला संघर्ष, भोवतीचं उघड-नागड जीवन, हे सर्व माझ्यागझलांचे विषय झालेले आहेत."[५] डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीदर्शी विचारांतून जन्मास आलेली ही कविता, जन्मताच वैचारिकता घेऊन आलेली आहे. ही कविता समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वासाठी झगडते. तसेच माणूसकीचे मूल्य निर्माण करण्यासाठी ती संघर्षशील असलेली आहे. सर्वहारा मानव्याच्या उन्नतीसाठीच ती अवतरलेली आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांना अबादित ठेऊन या भ्रष्ट व्यवस्थेचा निषेध नोंदवून अखंडमानव्याच्या मांगल्यासाठी ती माणूसपणाला अवाहन करते. आणि म्हणून या कवितेत विद्रोह येतो. हा विद्रोह माणसाला जगण्याचे नवे मूल्य प्राप्त करून देतो. म्हणून माणुसकीचा साक्षात्कार घडविणारी ही कविता वैचारिक होते.

''तुम्ही घातले घाव मी गप्प सोसले
आता तुमच्या घोड्यांना माझा लगाम आहे.''[६]

ज्यांनी मानवताच पायदळी तुडविली त्या प्रवृत्तीला आता आवर घातला पाहिजे. नाहीतर विद्ध्वंस ठरलेला आहे आणि खऱ्या अर्थाने इथून पुढेच नव्याची चाहूल लागते.

''मी शरण जातो
अशोक चक्राला
मी शरण जातो
त्याच्या चोवीस आऱ्यांना......
मी फुलासारखं उधळून टाकतो
माझ आयुष्य
अशोक चक्रावर
तिरंग्यावर
अशोकाने स्वीकारलेल्या बुद्धांवर
बुद्धांच्या शिष्यांवर.''[७] - (हॉटेल माझा देश.... ?)

कवी रत्नाकरांची ही कविता बाबासाहेबाचा वैचारिक वारसा जपत जपत बदलाचा घाव घालत निर्माण होते. हा घाव अन्यायावर आहे. आंबेडकरी प्रेरणेची ही दलित कविता पुढच्या पिढीला आपल्या तेजस्वी इतिहासाची व क्रांतीची आठवण करून देऊन त्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करते. तर सतत आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा मुकाबला करते.

## ५) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील भावाभिव्यक्ती :

कवी रत्नाकरांच्या जे अनुभवपरिघात येते त्याला ते शब्दरूप देताना दिसतात. हे सर्व कवितेची आणि कवीची भावाभिव्यक्तीच असते. आपण जगत असताना जे सोसावे लागले, जे भोगावे लागले. ते सर्व सरळ स्पष्ट अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न कवी रत्नाकरांनी केलेला आहे. सरळ स्पष्ट कोणताही आडपडदा न वापरता त्यांची अभिव्यक्ती ही निर्भय तर आहे, आणि अखंडमानवतावादी भावसौंदर्यही या कवितेत भरून राहिलेले आहे. या कवितेत व्यवस्थेविरोधीची चीड आहे. आजपर्यंत आपला

असली चेहरा लपवून या व्यवस्थेत जे अन्याय झाले, तो खोटा नकाब फाडून त्यांचा खरा चेहरा समाजासमोर आणते. या व्यवस्थेवर व ती राबविणाऱ्या ठेकेदारांवर ही कविता प्रहार करते. तशी ती कठोर आत्मपरिक्षणही करताना जाणवते. समाजातील ढोंगी प्रवृत्तीवर हल्ला करून स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवून घेणारे, सत्तेसाठी कसे पदभ्रष्ट होतात याचा आलेख मांडून अनेक शतकांच्या गुलामीची जाणीव करून देते.

''तुझे नाव घेतले तरी
न घेतले तरी
पण घ्यावे लागते
सौदेबाजी होत नाही त्याशिवाय
सत्ताही नाही मिळत त्याशिवाय''[८] – (सैतानाच्या खांबावर)

मनातील दु:ख, मनातील बोच कवी सरळ व्यक्त करतो. रत्नाकरांच्या कवितेतील जो विद्रोही सूर आहे, त्याला वैचारिकतेची जोड असल्याने तो प्रखर जहाल वाटत नसला तरी पूर्ण ताकदीनिशी तो व्यवस्थेच्या विरोधी उभा राहतो. हा विरोध वाईटाला नष्ट करून नवसर्जनाच्या निर्मितीसाठीचा, जगण्याचा मार्ग प्रकाशमान करण्यासाठीचाआहे. कवी हा स्वत: या चळवळीचा कार्यकर्ता आहे. बाबासाहेबानी जी चळवळ उभी केली तिची शकले होताना पाहून कवीच्या मनात विषण्णता दाटते. तीच विषण्णता शब्दरूप घेऊन त्यांच्याकवितेन आलेली आहे. इथे कोणाबद्दलचा राग हा भडकपणे व्यक्त न होता तो संयमानेच व्यक्त झालेला आहे. आणि म्हणूनच त्याची तिव्रता ही अधिक खोल जाणवते.

''मा.मु. तुमचे धोरण अनेकवेळा चुकलं
चळवळीचे वेगी घोडे अशानेच भकल.
'राजा' एक 'आज्ञा' तुम्हीमहामुर्ख प्रधान
विद्वत्तेच्या घोळात चांगलं प्यादंहुकलं.''[९] – (मा.मु. (?) )

रत्नाकरांची समग्र कविता ही मनव्याच्या प्रतिष्ठापणेसाठी अवतरते. म्हणूनच तर ती हॉटेल कामगारांच्या व्यथा वेदनेवर बोलते. तसेच आपल्या घरंदाज दारिद्रयाविषयी ही बोलते. विषमतेवर संयतपणे पण कठोर प्रहारकरते. आपल्या तेजस्वी इतिहासाची पुढच्या पिढीला आठवण करून देते. सैतानाचे खांब ढासळून नवसर्जनासाठी ही कविता कटीबद्ध आहे.

## ६) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील व्यक्तिचित्रणे :

डी.बी. रत्नाकरांच्या कवितेमध्ये येणारी व्यक्तिचित्रणे ही स्वतंत्रपणे येत नाहीत. तर त्यांच्याबरोबर तिथली परिस्थिती, त्या परिस्थितीतील माणसे तिथल्या समाजवास्तवासह येतात. जवळ जवळ ही सर्वच व्यक्तिचित्रणेही, समुहाचे, समाजाचे नेतृत्व करत येतात. त्यांना त्यांची व्यक्तिगतता राहत नाही. डी.बी. रत्नाकरांची प्रेमकविता वगळली तर त्यांच्या कवितेत नायक किंवा नायिका येत नाही. तर ती कविता आंबेडकरी समाजाचे जगणे, त्यातील भिषणता, या भिषण वास्तवात जगणारी केवीलवाणी माणसे या सर्वांसहीत येते. रत्नाकरांच्या कवितेत आईची व्यक्तीरेखा येते. मुळात अशिक्षित असणारी ही आई अंधश्रद्धाळू आहे. ती या अन्यायी व्यवस्थेची बळी ठरलेली आहे. ही आई अशी असली तरी आपल्या शिकलेल्या मुलाचे ऐकते. अंगात येणारी यल्लूबाई ती सोडून देते, व डॉ. बाबासाहेबानी सांगितलेल्या बुद्धाच्या विचाराला ती शरण जाते.

घरंदाज दारिद्र्यातही आपल्या मुलांनी शिकावं त्यासाठी जीवाचे रान, रात्रीचा दिवस करणारी, स्वत:ची पर्वा न करणारी आई कवीने रेखाटलेली आहे.

''बोंडातून कापूस कापूस
वेचणारी आई
मला दिसायची हॉटेलात
गंडमाळेने त्रस्त झालेली आई
ठसठसायची
माझ्यातल्या सर्वांग हॉटेलात.''[१०] – (आत्मकथा)

ज्या राजाने येथे नवे अनुशासन निर्माण केले त्या राजासाठी कष्ट सहन करणाऱ्या माता रमाबाई यांची व्यक्तिरेखा येते. तसेच हॉटेलात काम करणाऱ्या कामगारांचीही व्यक्तिचित्रणे येतात. श्रीनिवास, बारक्या, मुरली, परेश, मालकीन इत्यादींची व्यक्तिचित्रणे येतात. ही चित्रणे कवीने आपल्या शब्दसामर्थ्याने हुबेहूब उभी केलेली आहेत. हॉटेलात काम करणारे हे कामगार अनंत यातना सहन करीत जगत असतात. मुकेशही याचा बळी आहे.

''मुकेश......
तंदूरीसारखा थंड थंड होत जाऊन

रोटी सारखा संपून जातो.''[११] - (मुकेश)

अशा या व्यवस्थेच्या रेट्यात विझणाऱ्या अनेक व्यक्ती कवी रत्नाकरांच्या कवितेचा विषय झालेल्या आहेत. ज्या व्यक्तींनी बाबासाहेबाना पाहिले, त्यातीलच एक 'थळू आजा'

''त्यांनं पाहिलं होतं बाबासाहेबाना
त्यांच्या आठवणीनी
तक्या गच्च भरवून
जायचा गहिवरून
.......भीम आम्चागा राजा
थळू आजा.''[१२] - (कुबडा थळू आजा)

कवी रत्नाकरांच्या प्रेम कवितेत येणारी प्रेयसी ही काहीसी वेगळ्या रूपात येते. पारंपरिक व्यवस्था नाकारून नवी मूल्ये स्वीकारणारी कवीवर जीवापाड प्रेम करणारी अशी ही प्रेयसी आहे. बाबासाहेबाचे विचार आत्मसात करून ती व्यवस्थेला आव्हान करताना दिसते.

''चल उठ : तू आव्हाहनतेस
या व्यवस्थेच्या नाशासाठी आपण
दोघे बळी जाऊ
आपण लेखणीही होऊ
हत्यार ही होऊ
लढू मागे न पाहता.''[१३] - (वादळ)

या शिवाय गौतम बुद्ध, महात्मा फुले यांची ही व्यक्तिचित्रणे येतात. या सर्वच व्यक्तिचित्रणांतून एक वैश्विकतेची, सामूहिक नेतृत्त्वाची जाणिव होते. ही व्यक्तिचित्रणे एकेकटी न राहता त्यांना अनेकत्व मिळते.

## ७) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील संवादात्मकता :

दलित कविता ही व्यक्तीला, तिच्या प्रवृत्तीला व तत्कालीन परिस्थितीला आव्हान करते. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी विद्रोहीत

होते. यामुळेच खऱ्या अर्थाने या कवितेत संवादात्मकता निर्माण होते. फुले-आंबेडकरी कवितेने यमकादी संकल्पना नाकारून मुक्त छंदातच ती निर्माण झाल्याने व सामाजिक वास्तव हा तिचा मांडणी विषय असल्याने संवादात्मकता ही अपरिहार्यच आहे. सामाजिक भिषणता, भयाणक समाजवास्तव मांडण्यासाठी रचना सौंदर्य झुगारून द्यावेच लागते. म्हणून संवादात्मकता हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. रत्नाकरांची 'लक्तरांची गझल' मधील गझल वगळल्यास त्यांची संपूर्ण कविता ही संवादात्मकच आहे. लक्तरांची गझली मधील कविताही पूर्ण अंशी वगळता येत नाही. हा संवाद कधी स्वत:शी तर कधी व्यवस्थेविरोधी येताना दिसतो. संवादात्मकता हे रत्नाकरांच्या समग्र कवितेचे वैशिष्ट्य आहे. उदा.

"पण मी कधीच नाही म्हणणार
'हा देश माझा.....' म्हणून
अशोक चक्र .... बुद्धांपुरता
शिष्यांपुरता... तिरंग्यापुरता."[१४] – (हॉटेल माझा देश)

या देशावर कवीचे प्रेम आहे. इथल्या माणसांवर आहे. म्हणून सर्वहारा माणसाला माणूस माणनारा देश, त्यालाच देश म्हणावे. फक्त झेंड्यासाठी मी हा देश माझा म्हणत नाही. ही परिणामकारकता कवीने संवादातून साधलेली आहे.

"लेकरू: आई तुझं अंगात येणं बंद झालं पाहिजे
माय : आरं मी काय मुद्दाम करतुयं व्हय
लेकरू : मुद्दामच करतीस."[१५] – (आत्मकथा)

हा आईचा आणि कवीचा संवाद वास्तवता समोर उभी करतो व आंबेडकरांनी मूर्तीभंजनाचे जे विचार सांगितले होते तिथे घेऊन जातो. किंवा,

"गौतमा मी तुझ्या अहिंसेला सांगतो
क्षमा कर मला दान एक मागतो.
सांग मी तुला कधी टाळले का कोठे ?
पंचशीलेसाठी जुने सर्व त्यागतो."[१६] – (गौतमा)

कवी रत्नाकर अनेक शतकांचा अन्याय नष्ट करण्यासाठी थेट बुद्धांशी संवाद साधतात. ही कविता कधी आंबेडकरी समाजाशी संवाद साधते. तर, कधी बाबासाहेब

व स्वत:शीही संवाद साधते. या संवादात्मकतेतून रत्नाकरांच्या कवितेची वेगळी अशी ओळख निर्माण होते. ती ही की, त्यांची कविता गूढ गुंजनपरतेपेक्षा अधिक रोकठोक, गंभीर, परखड विचार प्रकटनाच्या गंभीर प्रवृत्तीची आहे. ती आत्मनिष्ठेबरोबरच सामूहिक वस्तुनिष्ठ आहे. हा संवाद कवीने समाजातील सर्व थरांतील व्यक्तीशी, प्रियेशी, तर कधी स्वत:शी साधलेला आहे. संवादात्मकता साधून ही कविता आपला हेतू स्पष्ट करते. त्यामुळे या कवितेला नवे परिमाण मिळालेले आहे. या सर्वच गोष्टींमुळे रत्नाकरांच्या कवितेची वाङ्मयीन उंची वाढलेली आहे.

## ८) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेची भाषा :

डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेची भाषा साधी, सरळ, सहज कळेल अशी आहे. ज्या समाजात कवी वाढला, खेळला त्या समाजातील वास्तव संदर्भ ही भाषा घेऊन आलेली आहे. शब्दांपलिकडील जिवंत अनुभव भाषेच्या माध्यमातून रत्नाकरांच्या कवितेत दृगोचर झालेले आहेत. कवी रत्नाकरांच्या भाषेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की तिच्यामध्ये कुठेही आक्रस्ताळेपणा, उरबडवेपणा दिसत नाही. मात्र त्यांच्या भाषेला विद्रोहात्मक वैचारिकतेची धार कायम आहे. प्रामुख्याने दलित कवितेची भाषा ही जहाल, रोखठोक असते. पण कवी रत्नाकरांनी अतिशय सौम्य भाषेत वास्तव स्थितीवर भाष्य केलेले आहे. सर्वसामान्याच्या दु:खाला वाचा फोडून नवसर्जनशील मानवतेची ग्वाही दिलेली आहे.

"भय नाही मला
माझ्या चिरडण्याचे
सैतानाच्या खांबावर मला दगड मारू दे
मला दगडमारू दे
सैतानाचा खांब उध्वस्त करू दे."[१७] – (सैतानाच्या खांबावर)

हजारो वर्षांच्या अनैतिक आराजकाला कवी भाषेच्या माध्यमातून तडाखे देतो.

"एकात्मतेच्या वावड्या उडविणारा
हा देश.......
संतती नियमांशी समागम करून
विषमतेची पिलावळ प्रसवणारा

हा देश.......
जात, धर्म, पंथ यांना
स्तनासारखं जपणारा
हा देश.....
शेंदूर दगड धुतलेल्या पाण्याला
तीर्थ माणणारा
हा देश.....''[१८] - (एकात्मता)

अशी ही भाषेच्या माध्यमातून परिणाम साधणारी, सौम्य वाटणारी पण विद्रोहाला वैचारिकतेची धार असलेली भाषा कवी रत्नाकरांच्या कवितेमध्ये येते.

## ९) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी :

प्रतिमा ही वाङ्मय कृतीचा आशय अभिव्यक्त करणारा महत्त्वाचा घटक असते. आशयाची विशेष प्रचिती करून देणारा, वाङ्मय कृतीची आस्वादकता वाढविणारा व तिला वाङ्मयीन सौंदर्य प्राप्त करून देणारा घटक म्हणजे प्रतिमा होय. प्रतिमेमुळेच वाङ्मय कृतीचा आशय दृगोचर होतो. प्रतिमेसंबंधी डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, ''प्रतिमा म्हणजे उच्चारांनी चिन्हांकित होणाऱ्या दोन किंवा अधिक मानसिक संदर्भामध्ये म्हणजेच त्यातील संवेदन कृती व तत्सलग्न भावनिक, वैचारिक घटक यामध्ये घडणाऱ्या साधर्म्य-वैधर्म्याधिष्ठित प्रक्रियेतून निर्माण होणारी मूर्त गतिशील अनेकार्थी सेंद्रीय घटना.''[१९]

डी.बी. रत्नाकर यांची कविता ही उपमा, प्रतिमांच्या भाषेत बोलते. विशेषत: त्यांच्या 'हॉटेल माझा देश' मधील कविता ही जास्त प्रतिमायुक्त असलेली दिसते. वास्तविक ही कविताच फुले-आंबेडकरी विचार घेऊन येते. समाजवास्तव मांडत असताना प्रतिमांच्या संघटनातून आशयाभिव्यक्तीस मदत होते. रत्नाकरांच्या कवितेमध्ये सूर्य, चंद्र, चांदणे, झाडे, फुले, आदि निसर्ग प्रतिमा येतात. तर आई, राजा, राणी इ. मिथके सुद्धा प्रतिमांच्यामधून येतात. हॉटेल व्यवसायाशी निगडीत पुष्कळच प्रतिमा त्यांच्या कवितेत येतात. त्यांच्या या उपमा, प्रतिमा निर्मिती मागे सौंदर्यनिर्मिती हा हेतू नसून, इथल्या अन्याय, विषमता, आर्थिक शोषण इत्यादी कारणांमुळे निर्माण झालेल्या व्यवस्थेविरोधीची दाहकता स्पष्ट करणे हा आहे. वाचकाला विचारपरिवर्तनाभिमुख करण्याचे प्रचंड सामर्थ्य या प्रतिमासृष्टित आहे. या प्रतिमांच्या

माध्यमातून विद्रोही आशयही प्रकट होतो. तर कधी कधी कलाविष्कारही घडतो. कवी रत्नाकरांच्याय कवितेतील सूर्यप्रतिमा ही डॉ. बाबासाहेबाच्या-साठी आलेली आहे. आजपर्यंत चंद्रप्रतिमा कोणीही बाबासाहेबाच्या संबंधाने वापरलेली नव्हती. मात्र रत्नाकरांच्या कवितेत ती वापरली गेलेली आहे. बाबासाहेबाच्या विचारांचा वारसा सांगताना कवी लिहितो,

''सूर्य मला सांगून गेला पुन्हा आता रडू नको
देश पेटवाय निघालेल्यांना सैल सोडू नको.''[२०] - (सूर्य)

गौतम बुद्धांच्या समतेचा विचार ज्यांनी अखंड भारतवर्षाला दिला. इथल्या सामाजिक, धार्मिक व्यवस्थेतील असहाय्यता बुद्धांच्या करूणेने सहन केली, तो चंद्रासारखा शीतल असणारा आमचा प्रकाशदाता. कवी लिहितो,

''झोपडीत चंद्रमाझ्या येऊन काल गेला
जीवघेण्या अंधाराला घेऊन काल गेला.''[२१] (चंद्र)

कवी रत्नाकरांची प्रतिमायोजना अचूक आहे. तशी आशय घटनेच्या दृष्टिनेही तितकीच महत्त्वाची आहे.

''मी ही एक अॅश-ट्रे च
दु:ख वेदनांचे तुकडे
आतल्या आत विझवणारा
अश्रूंचा अंधूक धूर ओकायलाही मुभा नसते.''[२२] - (अॅश-ट्रे)

मनातली खोलवर चाललेली घालमेल कवी रत्नाकरांनी मांडलेली आहे. 'टॉवेल' ही प्रतिमा वापरूनही योग्य परिणाम साधलेला आहे.

''वॉश बेसीनच्या स्टील नळीवर लटकणारा
सेवाभावी टॉवेल
आल्या गेल्याचे तोंड पुसत असतो
निर्मळ मनाने
जात पात न मानता
शोषूण घेतो हरेकांची घाण

टॉवेलसारखी माणसं जन्मली
दिशां दिशांत
तर.....?''[२३] - (टॉवेल)

या अशा स्वरूपाच्या प्रतिमा वापरून कवीने योग्य तो आशय वाचकांच्यासमोर ठेवलेला आहे. याशिवाय झाडे, विहीर, जंगल, पाऊस, गवत, घुमकं, सैतानाचा खांब, सकाळ झालेला चेहरा, हॉटेल व्यवसायाशी निगडीत काही उपमा, प्रतिमा, उदा.मलई कोप्ता, अजीनामोटो, तंदूरी, डेड फोन, फ्रायपॅन, म्होरी, कॅशपेड, गेस्टक्रेडीट, ओपन गर्मी संस्था, काऊंटर, नान, कुलया, अशा अर्थपूर्ण प्रतिमांचा वापर करून कवी रत्नाकरांनी जगण्यातील वास्तव रेखाटलेले आहे.

**१०) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील मिथके :**

रत्नाकरांच्या कवितेचे वाङ्मयीन मूल्यमापण करताना त्यांच्या कवितेत आलेल्या मिथकांचाही विचार करावा लागेल. रत्नाकरांच्या कवितेत 'मिथके' ही अगदी तुरळक प्रमाणात आढळतात. असे असले तरी जी मिथके येतात ती आगळी वेगळी, समाजाने उपेक्षित ठेवलेली माणसेच मिथके म्हणून येतात. मिथक म्हणजे जुन्या ऐतिहासिक किंवा पौराणिक कथांच्याद्वारे वर्तमान जीवनाची अभिव्यक्ती प्रभावी व आकर्षक करण्याची पद्धत. कवीने अशाच घटकांचा, अन्याय, अत्याचार झालेल्या ऐतिहासिक, पौराणिक व्यक्तींचा आधार घेऊन भोवतालच्या भयानक वास्तवाची जाणीव करून दिलेली आहे. कवी लिहितो,

''शांत मेनबत्तीत जळणारा येशू ही
चर्चमध्ये डळमळतोय.... या मोसमात.''[२४] - (दंगल)

स्वार्थासाठी घडवून आणलेल्या दंगली व त्यात झालेली सर्वसामान्यांची अवस्था कवीने समर्थपणे मांडलेली आहे. या कवितेत पुराणकथेतील अटंग्यावनातील 'राजाराणीची' गोष्ट सांगणारी आई येते. कवी लिहितो,

''माझी आई
राजाला अजूनही देतेय शिव्या
नावडत्याराणीचं बाळ त्यान
मारून टाकलं म्हणून.[२५] - (आकृतीबंध)

याशिवाय 'बामयानातील' राजाचे मिथक खास बुध्दांसाठी येते. कवी रत्नाकरांनी मिथकांच्या वापरातून समाजवास्तवातील दु:ख वेदनांबरोबरच अन्यायाचा प्रतिकार केलेला आहे.

## ११) डी.बी.रत्नाकर यांच्या कवितेतील 'स्व' चा शोध :

डी.बी. रत्नाकर यांची कविताही आंबेडकरांच्या विचारप्रणालीतून निर्माण झालेली आहे. वेदना, विद्रोह, नकार, भूक, अस्पृश्यता, दारिद्र्य, अगतिकता हे तिचे आशयसूत्र आहे. असे असले तरी ती जशी समाजवास्तवातून निर्माण झालेली आहे. तशी आत्मशोधातूनही प्रकट झालेली आहे. हे नाकारता येत नाही. 'एका विशिष्ट समाजस्थितीमध्ये आपण घडलो. जगलो. जगताना जे भोगले, अनुभवले त्या अनुभवाचा घेतलेला शोध म्हणजेच आत्मशोध,' असे म्हणता येईल. कवीचे समाजाशी व त्याच्या आंतरीक निष्ठांशी अटळ असे नाते असते. लेखन गर्भावस्थेत राहणारी ती एक प्रकारची आत्मनिष्ठाच असते. अशा प्रकारची आत्मनिष्ठा कवी रत्नाकरांच्या कवितेतही स्पष्ट दिसते.

"सुख शोधाया कधी हिंडलो नाही
दु:खाला मार्गदाता मानणारा मी
लक्तरात वाढलो, लाजलो नाही
ठिंगळांना सौंदर्य मानणारा मी." [२६] – (माणूस)

या दडपशाहीच्या शोषित व्यवस्थेत आपण स्वत: बोलू शकत नाही की, निर्भयपणे जगू शकत नाही. कारण तळहातावर असलेली भाकरी उडून जाण्याची भिती इथे कायम दाटून राहिलेली आहे. रत्नाकर लिहितात,

"मी ही एक अॅश-ट्रेच
दु:ख वेदनांचे तुकडे
आतल्या आत विझवणारा
अश्रूंचा अंधूक धूर ओकायलाही मुभा नसते.
ढुंगणाखालची खुर्ची
खूर्चीवरची भाकरी
भाकरी वरील भविष्य उडून जाईल ही भीती." [२७] – (प्रवास)

फुले-आंबेडकरी कवितेमधील आत्मनिष्ठा हाच स्वत:चाशोध असतो. असे मोतीराम कटारे म्हणतात. तर म.सू.पाटील यांनी आत्मशोध या शब्दाची व्याप्ती सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कवी जेव्हा स्वत:चा शोध घेतो. तेव्हा तो वैयक्तिक न राहता समूह जीवनाच्या पातळीवर जाताना दिसतो. आणि याच जीवन जाणीवांतून कवी आत्मशोध घेत असतो. या जीवन जाणीवांचा नवा अर्थ रत्नाकरांची कविता सांगते. हा आत्मशोध वाङ्मयीन दृष्टया फार महत्वाचा आहे.

## १२) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेचा रूपबंध :

डी.बी.रत्नाकर यांची कविता ही मुळात उपेक्षेच्या असहाय्य कढातून निर्माण झालेली आहे. त्यामुळे प्रस्थापित मराठी कवितेपेक्षा निश्चितच तिचे वेगळेपण जाणवते. प्रस्थापित मराठी कवितेपेक्षा ही कविता जीवन जाणीवांबरोबरच वृत्ती-प्रवृत्तीनेही भिन्न असलेली दिसते.

रचना सौंदर्य, पदबंध, शब्दघाट, प्रतिमा या प्रस्थापित कसोट्या झुगारून नवी वाङ्मयीन मूल्ये, नव्या जाणिवा ही कविता आविष्कृत करते. रचना कौशल्यापेक्षा रत्नाकरांनी आशयभिव्यक्तिला जास्त महत्व दिल्याने पदबंध, सौंदर्य, छंद, अलंकार, कल्पना विलास यात ती न रमता प्रखर वास्तव समोर आणते. रत्नाकरांच्या कवितेचा पदबंध हा वैचारिकतेवर आधारलेला आहे. 'लक्तरांची गझल' मधील गझल अपवाद सोडल्यास रत्नाकरांनी कवितेसाठी रूढ आकृतिबंध नोकारलेला आहे. त्यांची कविता ही जो आशय सांगायचा आहे, तसेच रूप घेताना दिसते. 'सैतानाच्या खांबावर' या संग्रहात याचा प्रत्यय येतो. गोंधळ, नाटक, अखंड, प्रार्थना, बालगीत, कहाणी अशाप्रकारे लोकसाहित्याचा रूपबंध ही कविता स्वीकारतांना दिसते. उदा.

''दगडू लेकानं
गोंधळ घातला
हॉटेलात कामाला लागला
कपा जी
बसी जी
जी जी रं
जी जी रं

जी जी जी....''[२९] - (आत्मकथा)

कधी ही कविता उखाण्याचे रूप घेऊन येते.

''आलाआला रुखवत
त्यावर होत्या शेनी
मारीन थोबाडीत न देशील
जर भाजून चानी.''[३०] - (आत्मकथा)

अशी वेगवेगळ्या रूपबंधात साकारणारी रत्नाकरांची कविता ही बंधमुक्त आहे. रचना घाटाचा विचार करण्यापेक्षा, जिवनमूल्यांचा, आशयमूल्यांचा विचार ही कविता करते. ही कविता गुळगुळीतपणा, रटाळपणा नाकारून नवीन रूपबंध स्वीकारते.

**१३) डी.बी. रत्नाकर यांच्या कवितेतील नवीन शब्दरचना :**

रत्नाकरांची कविता ही नामदेव ढसाळ यांच्या कवितेशी नाते सांगणारी आहे. प्रस्थापित मराठी कवितेचा रूपबंध ती नाकारते. आपल्याला हवा असलेला आशय शब्दांच्या मोडतोडीतून निर्माण करते. रत्नाकरांची 'हॉटेल माझा देश' मधील कविता ही अशाच प्रक्रियेतून जन्माला आलेली आहे. अभिव्यक्तीआशयाला योग्य असे शब्द आपोआपच इथे तयार झालेले दिसतात. उदा. हॉटेल चेहरा, तोफेच्या शिव्या, अश्रूंचा अंधूक धूर, फ्रायपॅनसारखा चेहरा, सकाळ झालेला चेहरा, डेड-फोनसारखं आयुष्य, ताठलेली भावना, साबणासारखी तू असे अभिव्यक्तिला साजेसे व आशयाला खोली प्राप्त करून देणारे अनेक शब्द, वाक्यप्रचार, म्हणी यांची निर्मिती नव्यानेच या कवितेत झालेली दिसते. त्यामुळे या कवितेचे वाङ्‌मयीन मोल अधिकच वाढलेले आहे.

वरील विवेचनावरून या प्रकरणातून काही ठळक निष्कर्ष निघतात. ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष :**

१) रत्नाकर यांची कविता समाजवास्तवावर भाष्य करून दु:ख, यातना, अन्यायाचे जसे दर्शन घडविते, तशी ती कठोर आत्मपरिक्षणाला सामोरे जाते.

२) रत्नाकरांच्या कवितासंग्रहांची व कवितांची शीर्षके ही अर्थपूर्ण अशीच आहेत. 'सैतानाच्या खांबावर' हे शीर्षक अनेक वर्षांची सैतानी प्रवृत्ती जशी दाखविते

तसे तिच्या नाशासाठी इतरांनाही प्रवृत्त करते. 'लक्तरांची गझल' व 'हॉटेल माझा देश' ही शीर्षकेसुद्धा अर्थसंपृक्त आहेत.

३) रत्नाकरांच्या कवितासंग्रहांच्या अर्पणपत्रिका ह्या त्यांच्या वैचारिकतेचे सुस्पष्ट दर्शन घडविणाऱ्या आहेत. ही कविता प्रामुख्याने परिवर्तनवादी विचार घेऊन येते. त्यामुळे ज्यांनी नवसर्जन निर्मिण्यासाठी अनंत कष्ट सोसले त्यांनाच कवीने हे संग्रह अर्पण केलेले आहेत.

४) रत्नाकरांच्या कवितेच्या रचनाबंधाचा विचार केल्यास प्रस्थापित मराठी कवितेपेक्षा तो नक्कीच वेगळा आहे. कधी ही कविता लोकसाहित्याचा रूपबंध स्वीकारते तर, कधी अभंग, अखंडाचा त्यामुळेच आशयाला इथे प्राधान्य दिलेले आहे.

५) 'लक्तरांची गझल' चा अपवाद सोडता रत्नाकरांची कविता ही मुक्तछंदात आहे. आशयाच्या प्रकटीकरणासाठी तिने शब्दांची मोडतोड केलेली दिसते.

६) रत्नाकरांची एकूणच कविता ही मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी प्राणपणाने लढते.

**समारोप :**

रत्नाकरांची कविता ही प्रामुख्याने परिवर्तनावादी विचार घेऊन येते. नवसृजनाच्या निर्मितीसाठी इथली सैतानी वृत्ती नष्ट करू पाहते, व त्यासाठी सैतानाच्या खांबावर दगड मारताना स्वत: चिरडेल याची भीती बाळगत नाही. ही कविता यमकालंकरापेक्षा आशयाला महत्त्व देते. त्यासाठी प्रस्थापित रूपबंध नाकारून आपला वेगळा रूपबंध निर्माण करते. यासाठीच नव्या शब्दांची, वाक्यप्रचारांची, म्हणींची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे वाङ्मयीन निकषांवर ही कविता कोठेही कमी पडत नाही, तर श्रेष्ठ वाङ्मयीन मूल्यांचाच आविष्कार ती घडविते. म्हणूनच कवी रत्नाकरांची कविता ही वाङ्मयिन दृष्ट्या श्रेष्ठ दर्जाची आहे.

-----

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १. | रत्नाकर धम्मपाल | : 'हॉटेल माझा देश', सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., मनोगत. |
| २. | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', समृद्धी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., डिसेंबर, २००३, प्रस्तावना, डॉ. प्रकाश देशपांडे-केजकर. |
| ३. | रत्नाकर धम्मपाल | : 'लक्तरांची गझल', नीहारा प्रकाशन, पुणे, प्र.आ., डिसेंबर,१९९४,लक्तरांची गझली,(कविता), पृ.क्र.२१. |
| ४. | रत्नाकर धम्मपाल | : उनि, 'सैतानाच्या खांबावर', (शीर्षक कविता) |
| ५. | रत्नाकर धम्मपाल | : 'लक्तरांची गझल', नीहारा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९४, प्रस्तावना, पृ.क्र. ६. |
| ६. | रत्नाकर धम्मपाल | : उनि, 'पूर्णविराम', (कविता), पृ.क्र.१०. |
| ७. | रत्नाकर धम्मपाल | : 'हॉटेल माझा देश', सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., पृ.क्र.६७. |
| ८. | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', भीमा (कविता), पृ.क्र.४८. |
| ९. | रत्नाकर धम्मपाल | : 'लक्तरांची गझल', मा.मु. (कविता) पृ.क्र.२५. |
| १०. | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', (आत्मकथा), पृ.क्र.७३. |
| ११. | रत्नाकर धम्मपाल | : उनि, 'भीममुद्रा', (कविता), पृ.क्र.४९. |
| १२. | रत्नाकर धम्मपाल | : 'हॉटेल माझा देश', मुकेश, (कविता), पृ.क्र.३५. |
| १३. | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबार', 'कुबडा थळू आजा', (कविता), पृ.क्र.७. |
| १४. | रत्नाकर धम्मपाल | : उनि, 'वादळ', (कविता), पृ.क्र.५२. |
| १५. | रत्नाकर धम्मपाल | : 'हॉटेलमाझा देश', (शीर्षक कविता), पृ.क्र.६८. |
| १६. | रत्नाकर धम्मपाल | : 'सैतानाच्या खांबावर', (आत्मकथा), पृ.क्र. ६९. |
| १७. | रत्नाकर धम्मपाल | : 'लक्तरांची गझल', (गौतमा), पृ.क्र.३५. |

१८. रत्नाकर धम्मपाल : ' सैतानाच्या खांबावर ', (शीर्षक कविता), पृ.क्र.

१९. रत्नाकर धम्मपाल : 'हॉटेल माझा देश', (एकात्मता), पृ.क्र.६२.

२०. कुलकर्णी मदत : 'दलित जाणिवेच्याय कवितेतील सूर्यप्रतिमा', गवळी प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ., १९६३, पृ.२९ मधून.

२१. रत्नाकर धम्मपाल : 'लक्तरांची गझल', (सूर्य), पृ.क्र.८.

२२. रत्नाकर धम्मपाल : 'लक्तरांची गझल', (चंद्र), पृ.क्र.२२.

२३. रत्नाकर धम्मपाल : ' हॉटेल माझा देश ', (अॅश-ट्रे), पृ.क्र.२२.

२४. रत्नाकर धम्मपाल : उनि, 'टॉवेल', (कविता), पृ.क्र.२८.

२५. रत्नाकर धम्मपाल : ' सैतानाच्या खांबावर', (दंगल), पृ.क्र.३४.

२६. रत्नाकर धम्मपाल : उनि., 'आकृतीबंध', (कविता), पृ.क्र.४६.

२७. रत्नाकर धम्मपाल : 'लक्तरांची गझल', (माणूस), पृ.क्र.५.

२८. रत्नाकर धम्मपाल : 'हॉटेल माझा देश', (अॅश-ट्रे), पृ.क्र.२२.

२९. रत्नाकर धम्मपाल : ' सैतानाच्या खांबावर', (प्रवास), पृ.क्र.२७.

३०. रत्नाकर धम्मपाल : उनि., 'आत्मकथा', पृ.क्र.७०.

३१. रत्नाकर धम्मपाल : उनि., 'आत्मकथा', पृ.क्र.६५.


-----